

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालय ठाणे आणि क्विकहील फाउंडेशन व महाराष्ट्र सायबर यांच्या संयुक्त विद्यमाने माहिती तंत्रज्ञान व संगणक विज्ञान या विभागांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'कमवा आणि शिका ' या योजनेचा प्रारंभ करण्यात आला. कमवा आणि शिका या योजनेमध्ये विद्यार्थी प्रथम क्विकहिल फाउंडेशन कडून सायबर सुरक्षा विषयी प्रशिक्षण घेऊन इतर शाळा व महाविद्यालयांमध्ये जाऊन सायबर जागरूकता मोहीम राबवणार आहेत. दिनांक 29 ऑगस्ट 2023 रोजी क्विकहील फाउंडेशन ने बांदोडकर महाविद्यालयामध्ये इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना एक दिवसीय कार्यशाळेद्वारे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा ' अंतर्गत प्रशिक्षण दिले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक केले. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि माहिती तंत्रज्ञान व संगणक विज्ञान विभाग प्रमुख प्राध्यापक अभिजीत काळे यांनी विद्यार्थ्यांना कमवा व शिका या योजनेमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित केले. महाराष्ट्र सायबर विभागातर्फे श्री. विजय सुतार आणि श्री. शैलेश साळुंखे यांनी सायबर गुन्हे , सायबर गुन्ह्याचे प्रवक्ते.